FORM-1 A | N.C.R.B. I.I.F.-I 198

# पहिली खबर

## FIRST INFORMATION REPORT

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम 154 अन्वये (Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य महाराष्ट्र, जिल्हा मुंबई, पोलीस ठाणे लो.प्र.वि, पहिली खबर क्र. ३२, वर्ष २०१८, दिनांक ०५/१०/२०१८
State District Police Station FIR No. Year Date

2. (i) अधिनियम Act भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८, कलमे Sections ७.
(ii) अधिनियम Act ........, कलमे Sections ........
(iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ........

3. (a) अपराधाची घटना : वार शुक्रवार, तारीख पासून ०५/१०/२०१८ वेळ १२:१३, तारीख पर्यंत ०५/१०/१८, वेळ १२:४८ वा दरम्यान
Occurrence of offence : Day Date from Time Date to Time
वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा. Tick applicable portion)
(1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
(6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (10) 18.00 ते 06.00
(b) पो. ठा. ला माहिती मिळालेचा तारीख ०४/१०/२०१८, वेळ १६:३० वा
Information received at P.S. Date Time
(c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. ........, तारीख ०५/१०/२०१८, वेळ १८:३० वा
General Diary Reference : Entry No. Date Time

4. माहितीचा प्रकार Type of Information : ........, लेखी / तोंडी Written / Oral लेखी

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा ........, चौकी / बीट / दुरक्षेत्र नाव व क्र. ........
Place of Occurrence : (a) Direction and distance from P.S. Chouki/Beat/O.P. Name and No.
(b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव मुख्य इमारत मंत्रालय, दुसरा मजला, मुंबई, ठिकाणाचे नंबर, गल्ली, रस्त्याचे नाव ........
Address of Occurrence Name प्रथम प्रशासन ... मध्ये No./Name Ward Name of road
जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण ........, गाव ........, पोस्ट ........, तालुका ........, जिल्हा ........, राज्य ........
Nearest identifiable Place Village Post Taluka Distt. State
(c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो. स्टे. चे नाव ........, तालुका ........, जिल्हा ........, राज्य ........
In case, outside the limit of this Police Station Taluka Distt. State

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.
(a) नाव Name महेश निंबाळकर (b) वडीलाचे / पतीचे नाव Father's /Husband's Name दत्तात्रय निंबाळकर
(c) जन्म तारीख व वय Date of Birth & Age ४४ वर्षे (d) राष्टीयत्व Nationality भारतीय फोन नं. Phone No. ८८२०१६३००४
(e) पारपत्र क्रमांक Passport No. ........ दिल्याचा दिनांक Date of Issue ........ दिल्याचे ठिकाण Place of Issue ........ (f) व्यवसाय Occupation खाद्य विक्री
(g) धर्म Religion हिंदू-मराठा जात Caste ........, जनजात Sub-Caste ........
(h) पत्ता : Address : ३०२, सुदामा पॅलेस, गणेश नगर, मानपाडा रोड गल्ली / सर्वे नं. Ward घर / नाव नंबर House/Name No. फोन /मो. नंबर Phone/M. No. ........ पॅन नं. Pan No. ........ वोटर्स नं. Card No. ........
रस्त्याचे नाव Road डोंबिवली (पूर्व), जि-ठाणे जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place ........ गाव Village ........ पोस्ट Post ........ पो. स्टे. P. Stn. ........
तालुका Taluka ........ जिल्हा Distt. ........ राज्य State ........ सध्याचा पत्ता Present Address ........

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयीताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासीक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
Details Name & Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)

लोकसेवक अविनाश शशिकांत गलांडे, वय ३० वर्षे, धंदा: नोकरी (लिपिक-टंकलेखक) नेमणूक - गृहविभाग पोल-०८, दुसरा मजला, मुख्य इमारत, मंत्रालय, मुंबई.

अ

## जबाब

फिर्यादी महेश दत्तात्रय निंबाळकर, वय ४४ वर्षे, पेशा-व्यवसाय रा. बी. ३०२, सुदामा पॅलेस, गणेश नगर, मानपाडा रोड, डोंबिवली (पु). यांनी दिलेला जबाब स्वतंत्र कागदावर संगणकावर टंकलिखित केला असून तोच गुन्ह्याची प्रथम खबर म्हणून संबोधण्यात येत आहे.

समक्ष

(शैलेंद्र चव्हाण)
पोलीस निरीक्षक
ला. प्र. वि. मुंबई.

Mahesh

Scanned with OKEN Scanner

जबाब दिनांक ०५/१०/२०१९

श्री महेश दत्तात्रेय निंबाळकर वय ४४ वर्षे, धंदा– व्यवसाय,रा.ठि. ३०२, सुदामा पॅलेस, गणेश नगर, मानपाडा रोड, डोंबिवली (पुर्व )मो.क्र.९९२०१६३००३

मी वरीलप्रमाणे असून वरील पत्त्यावर जन्मापासून कुटूबियासह रहावयास आहे. मी आमच्या परिसरात सामाजीक कार्य करतो. तसेच डोबिवली येथे रेल्वे स्टेशनला स्नॅक्स विक्री करतो. सदरच्या व्यवसायातुन मिळणाऱ्या उत्पन्नातुन माझ्या कुटुंबाचा उदारनिर्वाह चालतो.

माझेवर सन २०१७ मध्ये सामाजीक कार्य करीत असताना जिव घेणा हल्ला झाला होता. त्यासंदर्भात डोबिवली (पुर्व) येथे रामनगर पोलीस ठाणे येथे गु.र.क्र.६६/१७ कलम–३०७ भादवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यामध्ये ०८ आरोपीपैकी ०४ आरोपींना पकडले व उर्वरीत आरोपी यांना अद्यापपर्यंत अटक करण्यात आलेली नाही. वरील आरोपीकडून माझे व माझे कुटूबियांचे जिवीतास धोका असल्याने व मला भिती वाटत असल्याने माझेजवळ स्वत:चे व कुटूबियाचे बचाव करण्याकरीता शस्त्र परवाना असावा म्हणून मी ठाणे शहर पोलीस आयुक्त, यांना अर्ज केला होता परंतु माझा शस्त्र परवाना अर्ज नांमजुर करण्यात आला. त्यामुळे मी गृहराज्य मंत्री, मंत्रालय, मुंबई यांचेकडे दिनांक २८/०८/२०१९ रोजी अपिल अर्ज केला. शस्त्र परवाना अपिल अर्ज दाखल करण्याचे काम गृहविभाग, मंत्रालय येथील पोल –९ यांचेकडे असल्याने सदर पोलचे कक्ष अधिकारी श्री.इंगळे यांना मी दिनांक २८/०८/२०१९ रोजी भेटून अर्ज दिला. त्यावेळी माझे अर्जास उशिर झाला असून अपिलाची यादी तयार करण्यात आली असून आता माझा अर्ज अपिलाकरिता ठेवता येणार नाही.इलेक्शन नंतर मंत्रीमहोदय म्हणतील तेव्हा माझे अर्जाचा विचार होईल असे त्यांनी मला सांगितले. त्यावेळी मी माझेवर झालेलया हल्याची माहिती सांगून मला लवकर परवाना मिळावा याकरिता माझे अपिल अर्ज लवकर सुनावणीस ठेवावा अशी त्यांना विनंती केली. त्यावर त्यांनी माझा अर्ज स्वीकारला. त्यानंतर मला दिनांक २९/०८/२०१९ रोजी अपीलाबाबत मिटींग आयोजीत केली आहे. तुम्हाला उशिर झाला आहे. आता काही होणार नाही असे सांगितले. मी श्री. इंगळे साहेब यांना विनंती केली असता, त्यांनी मला पोल –९ येथे लिपीक पदावर काम करणारे श्री. अविनाश यांना भेटण्यास सांगितले व ते सांगतील ते करा, तेच तुमचे काम करतील असे सांगितले.म्हणुन श्री.अविनाश यांना भेटलो असता, त्यांनी मला शस्त्र परवानाचा अर्ज उदयाच्या अपिलमध्ये ठेवतो व त्या कामासाठी तुम्हाला पैसे दयावे लागतील असे सांगितले.त्यानंतर मला दि.२९/०८/२०१९ रोजी सकाळी १०.०० वा अपिल करीता पोलीस जिमखाना येथे हजर राहण्यास सांगितले. त्यानुसार मी दि.२९/०८/२०१९ रोजी सकाळी १०.०० वा मंत्रि महोदय यांचेसमोर अपिलासाठी हजर होतो. त्यावेळी श्री.अविनाश हे सुध्दा अपिलासाठी हजर होते. अपिल झालेनंतर त्यांनी मला तुमचे अपिल झाले असे सांगुन माझेकडे रू.५०००/–ची लाचेची मागणी केली. त्यानंतर लोकसेवकाने मला दोन ते तिन वेळा फोन केले. मला लोकसेवक श्री.अविनाश यांनी मागणी केलेली लाचेची रू.५०००/–रक्कम देण्याची इच्छा नसल्याने मी दिनांक ०४/१०/२०१९ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी, मुंबई येथे प्रत्यक्ष येवून वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे तोंडी तक्रार दिली व नंतर त्यांचे सांगण्यानुसार लोकसेवकाविरूध्द कायदेशिर कारवाई होणेकरिता मराठीत लेखी तक्रार दिली. लोकसेवक श्री.अविनाश यांचे पुर्ण नांव माहित नसल्याने तक्रार

समक्ष

( शैलेंद्र चव्हाण )
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी मुंबई.

Mahesh

खरी नक्कल
पोलीस निरीक्षक
अॅन्टी करप्शन ब्युरो, मुंबई

Scanned with OKEN Scanner

अर्जात पुर्ण नाव नमुद केले नाही. तसेच त्यांनी मला मोबाईलवरून दोन तिन वेळा संपर्क साधुन केव्हा भेटण्यास येणार असे विचारणा केली होती.

दि. ०४/१०/२०१९ रोजी लाचलुचपत प्रतितबंधक विभाग, मुंबई येथे पो.नि चव्हाण यांचेकडे लोकसेवक अविनाश यांचेविरोधात लेखी तक्रार अर्ज दिला होता. परंतु सदरचा अर्ज हा दुपारी ०४.०० वा. दिला. त्यावेळी मला पो.नि. चव्हाण यांनी पडताळणी कारवाई करिता लोकसेवकाचे मंत्रालयातील कार्यालयात जावे लागेल असे मला सांगितले. त्यावेळी मी त्यांना आता लोकसेवकाचे कार्यालय सुटेपर्यंत आपण मंत्रालय येथे पोहचू शकत नाही. तेव्हा माझे तक्रारीची पडताळणी उदया दिनांक ०५/१०/२०१९ रोजी करावी.

त्याप्रमाणे दि. ०५/१०/२०१९ रोजी मी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने दोन शासकिय पंचाना ब्युरो कार्यालयात पाचारण केले. त्यांना मी दिलेला तक्रार अर्ज वाचण्यास दिला व त्यानंतर अर्जावर पो.नि चव्हाण व पंचानी त्यांची स्वाक्षरी केली. त्यानंतर मी दिलेल्या तक्रारीच्या अनुशंगाने लोकसेवक श्री.अविनाश यांचे कार्यलिय मंत्रालय, दुसरा माळा, पोल–९ येथे प्रत्यक्ष भेटण्याकरीता जाण्याचे ठरल्याप्रमाणे नमुद दिवशी पो.नि.चव्हाण, पंच व मी असे ब्युरो कार्यालयाचे गोपनीय कक्षात जावुन माझे, पो.नि.चव्हाण तसेच पंचाचे वक्तव्य घेण्यात आले. सदरचे वक्तव्य डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमधील मायक्रो एस.डी.कार्ड मध्ये ध्वनीमुद्रित झाले असल्याचे सांगितले.

मी, पंच व पोलीस पथक हे सफेद रंगाच्या सुमो या पोलीस सरकारी वाहनातुन लोकसेवक याना मंत्रालय येथे भेटण्यासाठी निघलो असता, आम्ही ला.प्र.वि कार्यालयातुन निघुन वरळी सर पोचखान वाला रोड येथुन चर्चगेट येथील मिततल टॉवर बिल्डींग च्या समोर कोणासही संशय येणार नाही अशा रितीने पोलीस वाहन उभे केले. त्यांनतर पोलीस निरीक्षक चव्हाण यांनी मला, पंच व सापळा पथकास योग्य त्या सुचना देवुन माझे आतील बनियनला व्हाईस रेकार्डर लावले व पंच श्री. पाटील यास माझे बरोबर जाण्यास सांगितले. मी व पंच श्री.पाटील हे मंत्रालयाच्या नविन गेटच्या बाहेर भेटले असता, कामाचे बाबतीत चर्चा होवुन लोकसेवक श्री.अविनाश यांनी शस्त्र परवाना अर्ज अपिल मध्ये ठेवले म्हणुन माझेकडे रू. ५०००/–ची लाचेची मागणी केली त्यावेळी माझेकडे रू.३,०००/– आहेत व सदरची रक्कम कमी करण्यास सांगितली असता, श्री.अविनाश यांनी लाचेची रक्कम कमी करण्यास नकार दिला. त्यावेळी लोकसेवक श्री अविनाश यांना रू.५०००/– थोडयावेळाने आणुन देतो असे सांगितले असता लोकसेवक श्री.अविनाश यांनी दुपारी ०२.०० वा.च्या नंतर पैसे घेवुन त्याचे कार्यालयात भेटण्यास सांगितले. त्यामुळे मी पंचासह पोलीस वाहन पार्क केलेल्या ठिकाणी येवुन पो.नि चव्हाण यांना घडलेल्या हकीकती बाबत सांगितले. पो.नि.चव्हाण यांनी आमच्यात झालेले संभाषण पंच यांना ऐकवुन बरोबर असल्याचे खात्री करून सदरचे संभाषणामध्ये लोकसेवक श्री.अविनाश यांनी रू.५०००/– ची लाचेची मागणी केली असल्याची खात्री झाली व नमुद संभाषण डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमधील मायक्रो एस.डी.कार्ड मध्ये ध्वनीमुद्रित झाले असल्याचे सांगितले. पो.नि.चव्हाण यांनी सापळा पुर्व कारवाई/सापळा कारवाईचे आयोजन करण्यास सांगुन माझेकडे उपलब्ध असलेले लोकसेवकास देण्याकरीता रूपये हजर करण्यात सांगितले असता मी माझेकडे

समक्ष

( शैलेंद्र चव्हाण )
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी मुंबई.

Mahesh

बचतीतुन असलेले रू.५०००/- पो.नि.चव्हाण यांचेकडे पंचासमक्ष दिले. त्यामध्ये रू.५०००/- ५००/- दराची १० नोटा असुन सदर नोटांचा क्रमांक खालील प्रमाणे आहे.

१) 4FG 201946 2) 4FG 201947 ३) 4FG 201948 ४) 4FG 201949
५) 4FG 201950 ६) 4FG201951 ७) 4FG 201952 ८) 4FG 201953
९) 4FG 201954 १०) 4FG 201955

सापळा कारवाईतील पथकातील एका अंमलदाराने लाचेच्या रक्कमेला पंचासमक्ष कापसाच्या बोळयाने ॲन्थ्रासीन पावडर लावली. त्यानंतर पो.नि.चव्हाण यांच्या सुचनेवरुन सदर भारतीय चलनी नोटा ही घडी केलेली रू.५०००/- माझे शर्टच्या डाव्या खिशात अलगदपणे ठेवली व सुचना दिल्या. त्यानंतर पथकाने सापळा कारवाई करण्याचे आयोजन केले.

लोकसेवक श्री.अविनाश यांचे मंत्रालय येथे दुसऱ्या माळयावर पोल-९ येथे भेट घेतली असता ते त्याचे कार्यालयातून मला पुरूष प्रशाधनगृह मध्ये घेवुन गेले. त्यावेळी माझे बरोबर पंच श्री.पाटील होते. त्यावेळी मला लोकसेवक श्री.अविनाश यांनी हाताने इशारा करून लाचेची रक्कम मागणी केली असता, मी पंचासमक्ष माझेकडील डाव्या खिशात ठेवलेले रू.५०००/- लाचेची रक्कम ही लोकसेवक श्री.अविनाश याचेकडे दिली. लोकसेवक श्री.अविनाश यांनी सदर लाचेची रक्कम रू.५०००/- स्विकारली. त्यानंतर लोकसेवक श्री.अविनाश व मी त्याचे कार्यालयात पोल-९ येथे गेलो.नंतर मी लगेचच बाहेर येवुन लोकसेवक श्री अविनाश याने लाचेची रक्कम स्विकारल्याचा सापळा पथकास माझे डावे हाताने डोक्यावर हात फिरून इशारा दिला असता, सापळा पथकाने हे गृहविभाग पोल-९ येथे जावून लोकसेवक श्री. अविनाश यास ताब्यात घेवनु सरकारी वाहनाने पुढील कार्यवाहीसाठी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी मुंबई येथे घेवुन आले. त्यावेळी पो.नि.चव्हाण यांनी त्याचे नांव विचारले असता, त्याने त्याचे नांव अविनाश शशिकांत गलांडे वय ३० वर्षे असून तो मंत्रालय, गृहविभाग, पोल- ९ येथे लिपीक टंकलेखक पदावर असल्याचे सांगितले.

माझे लोकसेवक अविनाश शशिकात गलांडे यांच्याशी कोणतेही पूर्व वैमनस्य नसून कोणताही आर्थिक व्यवहार नाही. मी दि. ०४/१०/२०१९ रोजी दिलेल्या तक्रार अर्जाच्या अनुषंगाने पो.नि.चव्हाण यांनी आयोजित केलेल्या पडताळणी/सापळा कारवाई मध्ये लोकसेवक अविनाश शशिकात गलांडे यांनी शस्त्र परवानाचा अर्ज अपिला करीता ठेवले म्हणुन माझेकडे रुपये ५०००/- लाचेची मागणी करुन ती माझेकडुन स्विकारल्यानंतर पोलीसांनी रंगेहाथ पकडले. म्हणून माझी लोकसेवक अविनाश शशिकात गलाडे यांचेविरुध्द फिर्याद असून योग्य ती कायदेशिर कारवाई होण्यास विनंती आहे.

माझा जबाब संगणकावर मराठीत संगणीकृत केला असून तो मी वाचून पाहिला असता तो माझे सांगणे प्रमाणे बरोबर आहे.

समक्ष

( शैलेंद्र चव्हाण )
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी मुंबई.

Mahesh

खरी नक्कल
पोलीस निरीक्षक
ॲन्टी करप्शन ब्युरो, मुंबई.

Scanned with OKEN Scanner

तक्रारदाराने/फिर्यादीने तक्रार करण्याकरीता झालेल्या विलंबाची कारणे ........ तात्काळ

Reasons for delay in reporting by the complainant/informant

चोरीस गेलेल्या/अंतर्भुत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

..........

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भुत मालमत्तेचे एकूण मुल्य ..........

Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties) ..........

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक : ..........

Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet. if required) : Detail write down back blank page.

यातील फिर्यादी यांनी स्वतःचे नावे शस्त्र परवाना मिळणेकरीता गृहविभाग,
पोल-ई, मंत्रालय, मुंबई येथे ऑनलाईन अर्ज केला होता. सदर अर्जाची सुनावणी
लवकर होण्याकरीता यातील आरोपी लोकसेवक यांनी त्यांचे कायदेशीर कर्तव्यपार
पाडण्याकरीता कायदेशीर पारिश्रमिकाव्यतिरिक्त पारितोषण म्हणून यातील फिर्यादीकडे
स्वतःकरीता लाचेच्या स्वरूपात रु 50000/- इतकी मागणी करून ती
स्विकारल्यानंतर आलोसे लोकसेवक यांस रंगेहाथ पकडले म्हणून गुन्हा नोंद.

13. केलेली कार्यवाही :- 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :

पोलीस निरीक्षक शैलेंद्र चव्हाण

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण, ..........

.........., जिल्हा .........., राज्य ..........,

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.) .......... Rank.......... No. ..........
to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to .......... (3) Transferred to P.S ..........,
District .......... on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant/informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/informant, free of cost.

(R.O.A.C.)

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.
Signature of Officer In-charge, Police Station

14. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression of the Complainant / Informant.
Mahesh

संपूर्ण नाव Name शैलेंद्र चव्हाण
पदनाम Rank पोलीस निरीक्षक
तपासिक अं. चा कोड. क्र.
Posting ला. प्र. वि., मुंबई
Code No. of I. O. ..........

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख ..........
1. Date and time of submitted to the Court.

प्रत, 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4.तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.

Copy to, 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

Attachment to item 7 of **First Information Report**

Scanned with OKEN Scanner